आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० ऑक्टोबर २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचा सोहळा देशभरात साजरा होणार/ केवडिया इथल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाचा सहभाग

- जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारतानं पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्र्यांचं प्रतिपादन

- मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग आरक्षणाची सोडत येत्या ११ नोव्हेंबरला

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५९२ अंकांची घसरण

**आणि**

- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबईत सुरु असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाचं भारतापुढं विजयासाठी ३३९ धावांचं आव्हान

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. ऐकूया याविषयी अधिक माहिती…

- - व्हीसी - -

*(भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची दीडशेवी जयंती उद्या आहे. दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदा शतकोत्तर सुवर्णजयंतीचं औचित्य साधून देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. गुजरातमधे केवडिया इथं स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार पटेल यांच्या स्मारकापाशी प्रजासत्ताक दिन संचलनाच्या धर्तीवर एकता संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार आहे. या संचलनात विविध राज्यांची पोलिस दलं, घोडदळ, उंटदळ, इत्यादी सहभागी असतील. या संचलनात एकतेचा धागा या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ सहभागी होणार आहे. या महोत्सवात येत्या ७ आणि ८ नोव्हेंबरला सांस्कृतिक कार्यक्रमातही महाराष्ट्राच्या लोकपरंपरा दाखवणारं १५ ते २० कलाकारांचं*

*सादरीकरण असेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पाटणा इथं पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. येत्या १ नोव्हेंबर पासून १५ नोव्हेंबर पर्यंत भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनी म्हणजेच जनजातीय गौरव दिनापर्यंत भारत पर्व साजरं केलं जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.*

*राज्यात ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या काळात भारत पर्वा निमित्त विविध उपक्रम होणार असून त्यात युवकांनी भाग घ्यावा असं आवाहन राज्यशासनानं केलं आहे. यात पदयात्रा, निबंध वादविवाद स्पर्धा, चर्चासत्र, पथनाट्य अशा विविध आविष्कारातून सरदार पटेल यांच्या जीवनकार्याची ओळख करुन दिली जाईल आणि या लोहपुरुषाला अभिवादन करण्यात येईल.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज केवडिया इथं एकता नगरमध्ये एक हजार १४० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली आणि ई-बसना हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><><>**

जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते आज मुंबईत भारत नौवहन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वास्को द गामा भारतात पोहोचण्यापूर्वी अनेक वर्षांपासून भारतीय व्यापारी समुद्रमार्गे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले होते असं ते म्हणाले. अमृतकाळात नौवहन क्षेत्रातल्या भारतीय पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करुन घेतला पाहिजे असं आवाहन त्यांनी केलं.

- **- होल्ड - मांडवीय - बाईट -**

भारतीय नौवहन क्षेत्रातल्या अग्रणी महिला कॅप्टन जे सी आनंद यांचा मांडवीय यांनी सत्कार केला.

**<><><><><>**

पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्य़ाचा निर्णय सरकारनं घेतला आहे, यानुसार वीजदरात सवलतीचा लाभ देण्याची कार्यपद्धती निश्चित झाली असून यामुळे

पशुपालन व्यवसायाला चालना मिळेल, असं पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे. २५ हजारपर्यंत मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजारापर्यंत अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी, ४५ हजारापर्यंत क्षमतेचं अंडी उबवण केंद्र, शंभर दुधाळ जनावरांचा गोठा, पाचशे मेंढी किंवा शेळी गोठा तसंच दोनशे वराह असणाऱ्या पशुपालकांना या योजनेचा लाभ होणार आहे. या सवलतीचा लाभ मिळवण्यासाठी संबंधित पशुपालन प्रकल्पांनी पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्तांकडे नोंदणी करणं आवश्यक आहे.

<><><><><>

शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनात वाढ व्हावी यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाईल असं आश्वासन शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिलं. शालेय पोषण आहार कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत भुसे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. शालेय पोषण आहार कामगारांबाबत यापूर्वी राज्य शासनानं घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याला प्राधान्य दिलं जाईल, त्याचबरोबर इतर राज्यांनी घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास करुन किमान वेतन कायद्याबाबत देखील मार्गदर्शन घेतलं जाईल, असं भुसे म्हणाले.

<><><><><>

राज्यातल्या शासकीय रुग्णालयांमधला मृत्यूदर कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले आहेत. मुंबईत सेंट जॉर्ज रुग्णालयातल्या मृत्यूदर वाढीची गांभीर्यानं दखल घेऊन हसन मुश्रीफ यांनी आज तातडीची बैठक आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. शासकीय रुग्णालयांमधल्या वैद्यकीय सेवेत सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, निधी आणि उपकरणांची उपलब्धता वाढवावी, अतीदक्षता विभागात खाटांची संख्या, वाढवावी, आणि या सुधारणांसाठी दीर्घकालीन आराखडा तयार करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

<><><><><>

मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी वेगात सुरू झाली असून राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती आणि सोडत कार्यक्रमाचं सविस्तर वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार, निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडत काढली जाईल. १४ नोव्हेंबर रोजी आरक्षणाचं प्रारूप जाहीर झाल्यावर नागरिकांना आपल्या हरकती -

सूचना नोंदविण्याची संधी मिळेल. २० नोव्हेंबरपर्यंत या हरकती स्वीकारल्या जातील. त्यानंतर सर्व हरकतींचा विचार करून पालिका आयुक्त अंतिम निर्णय घेतील आणि आयोगाची मान्यता घेऊन अंतिम आरक्षण २८ नोव्हेंबर रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध होईल.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ही संपूर्ण प्रक्रिया निश्चित वेळापत्रकानुसार पूर्ण करणं बंधनकारक आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका जानेवारी २०२६ पूर्वी घेण्यात येतील, हे आता स्पष्ट झालं आहे.

<><><><><>

भारतीय शेअर बाजारांमध्ये आज घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ५९२ अंकांची घसरण झाली आणि तो ८४ हजार ४०४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १७६ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ८७७ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्समध्ये नोंदणी झालेल्या ३० पैकी २३ कंपन्यांनी आज घसरण नोंदवली. यात उर्जा, तंत्रज्ञान या क्षेत्रांचा समावेश आहे. तर खनिज तेल, वायू, सिमेंट, इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात आज वाढ पाहायला मिळाली.

<><><><><>

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत आज नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर सुरु असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतापुढं विजयासाठी३३९ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात सर्वगडी गमावून ३३८ धावा केल्या. फीबी लिचफिल्डनं तडाखेबंद खेळी करत ११९ धावा केल्या. एडीज पेरिनं ७७ तर ॲशली गार्डनरनं ६३ धावांचं योगदान दिलं.

<><><><><>

माजी राज्यपाल रा. सु. गवई यांच्या स्मारकाचं लोकार्पण आज अमरावती इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. गवई यांनी विविध पदावर काम केलं, त्यांची संसदीय कारकीर्द उत्तुंग आहे. पक्षीय सीमा ओलांडून त्यांनी सर्वांसोबत संबंध ठेवले, त्यामुळे देशभरातील लोक त्यांच्याशी जोडले गेले असं मुख्यमंत्री म्हणाले.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री (५२.२८ ते ५२.५१) - -**

**- <><><><><>**

गेल्या २४ तासात मराठवाड्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली, तर कोकणात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकणात सर्वत्र, विदर्भात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल. किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहिल.

**//<><><><><>//**